तंत्रशिक्षण संचालनालयातील उप संचालक या पदावरील पदोन्नतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
*शासन निर्णय क्र.एससीटी-६५०७/(१३३/०७ )/तांशि-४*
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- १४/८/२००८

संदर्भः-संचालक,तंत्रशिक्षण यांचे क्र.४/आस्था/२००८/४३८,दि.२/६/२००८ चे पत्र.

**शासन निर्णयः-** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशासकीय सेवा गट-अ या संवर्गात रु.१०६५०-३२५-१५८५० या वेतनश्रेणीत उपसंचालक,गट-अ या पदावर तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सहायक संचालक(तांत्रिक) या पदावरील खालील अधिका-यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ-६ मध्ये दर्शविण्यात येत आहेः-

| अ.क्र | अधिका-याचे नांव व सध्याचे पदनाम | सध्या कार्यरत कार्यालयाचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीनंतरचे पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | डॉ.व्ही.एम.मोहितकर (इमाव),सहायक संचालक(तां.)तंत्रशिक्षण संचालनालय,मुख्य कार्यालय,मुंबई | तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय,मुंबई | खुला | उपसंचालक | तंत्रशिक्षण संचालनालय,मुख्य कार्यालय,मुंबई येथील रिक्त असलेल्या उपसंचालक या पदावर. |

४. मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील याचिका क्र.८४५२/२००४ च्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.९/३/२००७ रोजी दिलेले आदेश व त्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.१३/३/२००७ व सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.१/४/२००८ अन्वये दिलेल्या सूचना लक्षात घेता,मूळ याचिका क्र.८४५२/०४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नत्या तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

५. उपरोक्त अधिका-यांची पदोन्नती ही सरळसेवेच्या कोटयातील पदावर देण्यात येत असल्याने ही पदोन्नती ११ महिने किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

६. पदोन्नतीसाठी निवड झालेल्या वरील अधिका-यांनी ३० दिवसाच्या आत नवीन पदावर रुजु व्हावे.सदर विहीत मुदतीत जे अधिकारी पदोन्नतीवरील पदावर रुजु होणार नाहीत अथवा जे अधिकारी पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शवतील,त्यांचे नांव पदोन्नतीसाठी पात्र असणा-या अधिका-यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात येईल.सदर पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणा-या अधिका-यांची निवड यादी त्यानंतर जेव्हा बनवण्यात येईल,त्यावेळी पदोन्नती नाकारणा-या अधिका-यांच्या प्रकरणाचा गुणवत्तेप्रमाणे पुन्हा विचार केला जाईल

७. प्रस्तुत शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०७५/१२,दि.२४/७/२००८ व अनौपचारिक संदर्भ क्र.८६८/१६ब, दि.५/८/२००८ अन्वये मिळालेल्या मान्यतेअंती निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(वि.भा.सोनवणे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत:-

- संचालक,तंत्रशिक्षण,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
- सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,अमरावती,नागपूर,नाशिक,औरंगाबाद.
- संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई.
- महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
- सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग(पत्राव्दारे).
- अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
- निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
- सामान्य प्रशासन विभाग,(कार्यासन १२ व १६-ब),मंत्रालय.
- संबधीत अधिकारी व त्यांची कार्यालये.
- निवड नस्ती(तांशि-४)